सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६

आतील पानावर

पान २– उज्वल निकम यांच्या भूमिकेत दिसणार
पान ३– ‘हेरा फेरी ३’ला वादाचं ग्रहण!
पान ४– ‘एक दिन’ चित्रपटात साई पल्लवी
पान ५– निर्मिती सावंत पुन्हा सासूच्या भूमिकेत
पान ७– सनी देओल ‘या’ चित्रपटांतून झळकणार





# ‘तू या मैं’ मध्ये दिसणार शनाया

दिग्दर्शक बेजॉय नाम्बियारचा आगामी सर्वाइवल थ्रिलर चित्रपट ‘तू या मैं’चा प्रदर्शित झाला आहे. चित्रपटात आदर्श गौवर आणि शनाया कपूर अशा इन्फ्लुएंसरची भूमिका साकारत आहेत, जे एका रक्तपिपासू मगरीच्या तावडीत सापडतात. लोकांना हा ट्रेलर पसंत पडला आहे. शनाया यात ‘मिस वॅनिटी’ तर आदर्श हा नालासोपर्यातील एक क्रिएटर ‘ए’च्या भमिकेत आहे. हा चित्रपट दोन वेगवेगळ्या ठिकाणांवरून येणाऱ्या या दोन इन्फ्लुंएसरांच्या दोन वेगवेगळ्या जगताला दर्शविणारा आहे. ए आणि मिस वॅनिटीचा वायरल कंटेंट आणि जोखिमयुक्त स्टंट करण्याचा ध्यास एका भयानक स्वप्नात बदलतो. ते रक्ताने माखलेल्या एका रिकामी स्विमिंग पूलमध्ये उतरतात.

रोमांचाने भरपूर स्टंट करण्याची इच्छा जगण्या मरण्याच्या लढाईत रुपांतरित होते. वेगळे अन् कमकुवत झालेले हे दोन्ही एका घातक मगरीसोबतच्या संघर्षात अडकून पडतात. ट्रेलरमध्ये आदर्श आणि शनाया यांचा पळण्याचा प्रयत्न दाखविण्यात आला असून यात ते काच तोडताना आणि पाण्याने भरलेल्या भुयारांमधून जात पूलाबाहेर पडण्याचा प्रयत्न करतात. अन्य दृश्यात शनाया साकारत असलेली व्यक्तिरेखा वेदनेने ओरडत असताना आणि मगर तिला खेचून नेत असल्याचे दिसून येते.






# प्रियांकाला सिनेमात घेणं परवडणारं नाही!

बॉलिवूड ते हॉलिवूड असा यशस्वी प्रवास करणारी लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे प्रियांका चोप्रा. देसी गर्ल म्हणून नावारुपाला आलेली प्रियांका आज ग्लोबल स्टार म्हणून ओळखली जाते. म्हणूनच, तिच्यासोबत काम करायला अनेक कलाकार, दिग्दर्शक, निर्माते उत्सुक असतात. परंतु, या सगळ्यामध्येच एका अभिनेत्रीचं वक्तव्य चर्चेत आलं आहे. 'प्रियांकासोबत काम करणं परवडणारं नाही', असं वक्तव्य अभिनेत्री आणि प्रियांकाची चुलत बहीण मीरा चोप्रा हिने केलं आहे. प्रियांकाप्रमाणेच अभिनय क्षेत्रात पदार्पण करणार्या मीराने काही मोजक्या सिनेमांमध्ये काम केलं. मात्र, तिला म्हणावं तसं यश आलं नाही. अभिनयानंतर मीरा निर्मिती क्षेत्रात पदार्पण केलं आहे. 'गांधी टॉक्स' या सिनेमाची निर्मिती मीराने केली आहे. या सिनेमाच्या निमित्ताने अलिकडेच तिने एक मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये तिने प्रियांकासोबत काम करण्याविषयी भाष्य केलं आहे. पुढे भविष्यात तू निर्मिती केलेल्या सिनेमात तुझी बहीण प्रियांकाला घेणार का? असा प्रश्न मीराला विचारण्यात आला. त्यावर मीराने दिलेलं उत्तर चर्चेचा विषय ठरलं. नाही, नाही. सध्या तरी मी तसं काहीच करु शकत नाही. कारण, तिला सिनेमात घेणं हे मला परवडणारं (आर्थिकदृष्ट्या) नाही. मी स्वप्नात सुद्धा हा विचार करु शकत नाही. पण, जेव्हा मी खूप मोठी सिनेनिर्माता होईन, त्यावेळी नक्कीच एक दिवस प्रियांकाला माझ्या सिनेमात घेईन, असं मीरा म्हणाली.

# उज्वल निकम यांच्या भूमिकेत दिसणार राजकुमार



सेलिब्रिटी चित्रपटांच्या माध्यमातून वेगवेगळ्या भूमिकांतून प्रेक्षकांसमोर येत असतात. हल्ली तर चरित्रपटांवर विशेष भर दिला जातो. अशा चित्रपटात मुख्य भूमिकेत असणाऱ्या कलाकाराला विशिष्ठ व्यक्तीसारखं दिसायचं असतं. त्यामुळे कलाकार त्यानुसार स्वत:वर काम करत असतात. बायोपिकमध्ये काम करताना बऱ्याचदा कलाकारांना वजन घटवणे, वाढवणे अशा गोष्टी कराव्या लागतात. अशातच आता बॉलीवूड अभिनेता राजकुमार रावसुद्धा सध्या त्यामुळेच चर्चेत आहे. त्यानं त्याच्या आगामी चित्रपट 'निकम'साठी वजन वाढवलं आहे. वजन वाढवण्यासाठी त्यानं काय केलं आणि किती वजन वाढवलं आहे आणि लूकमध्येही थोडा बदल केला आहे. त्याबद्दल त्यानं नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत सांगितलं आहे.

इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत राजुकमार म्हणाला, माझं अस्तित्व माझ्या कलेमुळेच आहे. मी बायोपिक 'निकमं'चं शूटिंग नुकतंच पूर्ण केलं आहे आणि हो, या भूमिकेसाठी मला शारीरिक बदल करावे लागले, जे मला खूप आवडतात. शक्य असेल तोपर्यंत मी प्रोस्थेटिक्सचा आधार घेत नाही; मेहनतीतून लूक साध्य करता येत असेल, तर मी तसंच करतो. 'निकम'साठी मी तेच केलं. वजन वाढवणं, ठरावीक वय साकारण्यासाठी वयस्कर दिसणं किंवा केस पातळ करणं, ज्याला माझा हेअर स्टायलिस्ट खूप विरोध करत होता. राजुकमार पुढे म्हणाला, 'बोस'साठी अर्ध टक्कल करू नकोस, 'ट्रॅप्ड'साठी इतकं वजन वाढवू नकोस किंवा खाणं थांबवून इतकं वजन कमी करू नकोस आणि 'श्रीकांत'दरम्यान कॅमेरे बंद असतानाही दृष्टीहीन व्यक्तीसारखं वागू नकोस. असे अनेक सल्ले मला मिळाले होते. 'निकम'साठी मला ९-१० किलो वजन वाढवावं लागलं. मी रोज दोन पिझ्झा, भरपूर गोड पदार्थ, माझे आवडते आलू पराठे, बिर्याणी खात होतो. हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे. तेव्हा तुम्हाला पडद्यावर ही सगळी मेहनत नक्कीच दिसेल, अशी आशा आहे.

राजकुमार राव पुढे त्याच्या दुसऱ्या चरित्रपटाबद्दल माजी क्रिकेटपटू सौरव गांगुली यांच्या जीवनावर आधारित असलेल्या चित्रपटाबद्दल म्हणाला, आता ट्रान्स्फॉर्मेशनचा टप्पा सुरू झाला आहे. वाढलेलं वजन कमी करून, 'गांगुली मोड'मध्ये जाण्याची वेळ आली आहे. तुमचं मनोरंजन करण्यासाठी मी नेहमीच माझ्या कामातून सर्वोत्तम प्रयत्न करत राहीन.

# अक्षय खन्नाला मिळाला बॉलिवूडचा मोठा सिनेमा?




अक्षय खन्ना हा बॉलिवूडमधील चर्चेतील अभिनेता आहे. 'धुरंधर' सिनेमात अक्षयने साकारलेल्या रहमान डकैतच्या भूमिकेने प्रेक्षकांचं मन जिंकलं. काहीच दिवसांपूर्वी अक्षयने 'दृश्यम ३' नाकारल्याने मोठा वाद निर्माण झाला होता. आता 'दृश्यम ३' मधून बाहेर गेलेल्या अक्षयच्या हातात मोठा प्रोजेक्ट लागला आहे. या सिनेमाचं नाव आहे 'तुंबाड २'. २०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या आणि प्रेक्षकांना थरारक अनुभव देणाऱ्या 'तुंबाड' चित्रपटाच्या सीक्वलची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. अभिनेता आणि निर्माता सोहम शाहने काही महिन्यांपूर्वी 'तुंबाड २'ची अधिकृत घोषणा केली होती. ताज्या अहवालानुसार, चित्रपटातील मुख्य खलनायकाच्या भूमिकेसाठी बॉलिवूडचे दोन दिग्गज अभिनेते अक्षय खन्ना आणि नवाजुद्दीन सिद्दीकी यांच्या नावांची चर्चा आहे. रिपोर्टनुसार, 'तुंबाड २' च्या निर्मात्यांना या भागात एक अतिशय शक्तिशाली खलनायक हवा आहे. हा खलनायक केवळ भीती निर्माण करणारा नसून त्याचा प्रेक्षकांवर मानसिक परिणाम होईल, अशी निर्मात्यांना आशा आहे. त्यामुळेच अक्षय खन्ना आणि नवाजुद्दीन सिद्दीकी या दोघांपैकी एका नावाची 'तुंबाड २' साठी चर्चा आहे. अक्षय खन्नाने अलीकडेच 'दृश्यम २' आणि 'धुरंधर' सारख्या चित्रपटांतून आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली आहे. दुसरीकडे, नवाजुद्दीन सिद्दीकी 'गँग्स ऑफ वासेपूर' आणि 'रमन राघव २.०' सारख्या चित्रपटांतील नकारात्मक भूमिकांसाठी प्रसिद्ध आहे. आता या दोघांपैकी कोणाची वर्णी लागते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. जेव्हा 'तुंबाड' प्रदर्शित झाला होता, तेव्हा सुरुवातीला बॉक्स ऑफिसवर त्याला संमिश्र प्रतिसाद मिळाला होता. मात्र, हळूहळू या चित्रपटाला 'कल्ट' दर्जा प्राप्त झाला. २०२४ मध्ये जेव्हा हा चित्रपट पुन्हा प्रदर्शित झाला, तेव्हा त्याने बॉक्स ऑफिसवर कमाईचे विक्रम प्रस्थापित केले. याच यशानंतर सोहम शाहने सीक्वलचे काम वेगाने सुरू केले आहे. अद्याप निर्मात्यांनी या कास्टिंगबाबत अधिकृत घोषणा केलेली नाही, परंतु या बातमीमुळे 'तुंबाड २' बाबत प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

# शूटिंग सुरु असतानाच 'या' अभिनेत्याने सोडला 'स्पिरिट'



संदीप रेड्डी वांगा यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होत असलेला 'स्पिरिट' हा चित्रपट सध्या सिनेसृष्टीत चांगलाच चर्चेत आहे. याआधी दीपिका पादुकोणने ८ तासांच्या शिफ्टच्या कारणाने हा सिनेमा सोडला होता. आता याच चित्रपटात झळकणारे दिग्गज अभिनेते प्रकाश राज यांनी अचानक एक्झिट घेतली आहे. हैदराबादमध्ये सुरू असलेल्या शूटिंग दरम्यान दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा आणि प्रकाश राज यांच्यात एका सीनच्या चित्रीकरणावरून जोरदार वाद झाला. चित्रपटाची जी पटकथा होती त्यानुसार शुटिंग करताना दोघांमध्ये 'क्रिएटीव्ह' गोष्टींवरुन वैचारिक मतभेद निर्माण झाले. हे मतभेद इतके टोकाला गेले की, सेटवर दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले आणि प्रकाश राज यांनी तडकाफडकी चित्रपट सोडण्याचा निर्णय घेतला. असेही बोलले जात आहे की, सेटवर प्रकाश राज ज्या प्रकारे वागत होते, त्यांचं वर्तन टीमला आवडले नव्हते, ज्यामुळे निर्मात्यांनी त्यांना चित्रपटातून बाहेरचा रस्ता दाखवण्याचा कठोर निर्णय घेतला. प्रकाश राज या चित्रपटात एका अत्यंत महत्वाच्या भूमिकेत दिसणार होते आणि त्यांच्या आवाजातील टीझरने आधीच चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण केली होती. मात्र, आता त्यांच्या जाण्याने आधी शूट केलेले काही सीन्स पुन्हा चित्रित करावे लागू शकतात, ज्यामुळे चित्रपटाच्या कामाला विलंब होण्याची शक्यता आहे. याआधी दीपिकाने देखील मतभेदानंतर या चित्रपटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर तिची जागा आता तृप्ती डिमरीने घेतली आहे. 'ॲनिमल'च्या अफाट यशानंतर संदीप रेड्डी वांगा 'स्पिरिट'च्या माध्यमातून पुन्हा एकदा प्रेक्षकांना थक्क करण्यासाठी सज्ज झाले आहेत. यात प्रभास पहिल्यांदाच एका धाडसी पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात तृप्ती डिमरीसोबतच विवेक ओबेरॉयचीही महत्वाची भूमिका आहे.

# 'हेरा फेरी ३'ला वादाचं ग्रहण!



'हेरा फेरी ३' हा चित्रपट घोषणा झाल्यापासूनच काहीना काही कारणांनी चर्चेत आहे. या चित्रपटाभोवतीचे कायदेशीर वाद काही केल्या संपताना दिसत नाहीयत. आधी चित्रपटातील मुख्य कलाकार अक्षय कुमार आणि परेश रावल यांच्यातील वाद चर्चेत आला. हा वादमिटताच आता हा चित्रपट कॉपीराइटच्या वादात अडकला आहे. एका दाक्षिणात्य निर्मात्याने मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल करत, निर्माता फिरोज नाडियाडवाला यांच्याकडे 'हेरा फेरी' फ्रँचायझीचे हक्कच नाहीत, असा दावा केला आहे. त्यामुळे आता 'हेरा फेरी ३'बाबत आता नवा वाद उभा राहिला आहे. अहवालानुसार, प्रॉडक्शन हाऊसने असा दावा केला आहे की, फिरोज नाडियाडवाला यांना फक्त एका चित्रपटाचा रिमेक करण्याचा अधिकार देण्यात आला होता.

१९८९ साली आलेल्या मल्याळम चित्रपट 'रामजी राव स्पीकिंग'च्या २००० साली प्रदर्शित झालेल्या 'हेरा फेरी'चेच राइट्स त्यांना देण्यात आले होते. मात्र, निर्मात्याचा आरोप आहे की नाडियाडवाला यांनी कराराचं उल्लंघन करत २००६ साली 'फिर हेरा फेरी' हा सिक्वेल तयार केला. इतकंच नाही, तर पुढे या फ्रँचायझीचे हक्क त्यांनी तिसऱ्या व्यक्तीला विकले. ही तिसरी व्यक्ती म्हणजे, अक्षय कुमारची प्रॉडक्शन कंपनी. या आरोपांनंतर म द्रास उच्च न्यायालयाने वाद न्यायालयात प्रलंबित असताना फिरोज नाडियाडवाला यांना असा चित्रपट बनवणं कायदेशीर आहे का? अशी विचारणा करण्यात आली. याबद्दल बोलताना जी.पी. विजयकुमार यांनी सांगितले की, त्यांनी मूळ निर्मात्यांकडून 'हेरा फेरी' फ्रँचायझीचे सर्व हक्क विकत घेतले आहेत. ते म्हणाले, मी २०२२ मध्ये 'राम जी राव स्पीकिंग' या चित्रपटाचे मूळ निर्माते adithya Filmr यांच्याकडून 'हेरा फ`री'चे राईट्स खरेदी केले. त्यांनी मला सांगितले होते की फिरोज नाडियाडवाला यांना फक्त एका चित्रपटाच्या रिमेकची परवानगी होती. पण त्यांनी २००६ मध्ये दुसरा चित्रपटही बनवला. त्यांना सिक्वेल आणि पुढील भागांचा किंवा पात्रांचा वापर करण्याचे काहीच राईट्स नव्हते. विजयकुमार पुढे म्हणाले, आम्ही अक्षय कुमार यांच्याशी संपर्क साधला. तेव्हा आम्हाला कळलं की, फिरोज नाडियाडवाला यांनी या फ्रँचायझीचे हक्क अक्षय कुमारच्या Care of Good Filmr ला विकले आहेत. याबाबत आम्ही त्यांना कायदेशीर नोटीस पाठवली. याप्रकरणी न्यायालयात जाण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. दरम्यान, अक्षय कुमारच्या प्रॉडक्शन हाऊसच्या एका प्रवक्त्याने सांगितले की, फिरोज नाडियाडवाला यांच्याकडे 'हेरा फेरी' फ्रँचायझीचे पूर्ण हक्क आहेत. याबाबत फिरोज नाडियाडवाला यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. तर 'हेरा फेरी ३'चे दिग्दर्शन करणारे प्रियदर्शन यांनी यावर मला काहीच माहिती नाही, अशी प्रतिक्रिया दिली आहे.



# 'चेल्लम' सरांचा नवा चित्रपट येतोय!

'द फॅमिली मॅन' या वेब सीरिजमधील 'चेल्लम सर' या भूमिकेतून घराघरात पोहोचलेले अभिनेते आणि दिग्दर्शक उदय महेश आता एका नव्या चित्रपटासह प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. त्यांचा तमिळ चित्रपट 'लकी द सुपरस्टार' सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे. हा चित्रपट थेट ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होण्यासाठी सज्ज झाला आहे. जिओ हॉटस्टारने आपल्या आगामी साऊथ इंडियन चित्रपटांची यादी नुकतीच जाहीर केली आहे.

'लकी द सुपरस्टार' हा चित्रपट चित्रपटगृहांऐवजी थेट जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित होणार आहे. विशेष म्हणजे, हा चित्रपट तमिळसोबतच हिंदी आणि इतर प्रादेशिक भाषांमध्येही उपलब्ध असणार आहे. हा चित्रपट एका गोंडस कुत्र्याभोवती फिरतो, ज्याचं नाव 'लकी' आहे. लकी हा साधा कुत्रा नसून त्याच्याकडे एक विलक्षण शक्ती आहे, ज्यामुळे ज्याच्याकडे तो असेल त्याच्या आयुष्यात सौभाग्य आणि आनंद येतो. चित्रपटात काही भ्रष्ट राजकारणी स्वतःच्या स्वार्थासाठी या कुत्र्याचा वापर करण्याचा प्रयत्न करतात आणि त्याला पळवून नेतात. एका लहान मुलीला हे कुत्रं भेट म्हणून मिळतं, पण ते हरवल्यानंतर तिची होणारी अवस्था आणि त्यानंतर अभिनेता जीव्ही प्रकाश या पिल्लाला वाचवण्यासाठी कसा संघर्ष करतो, हे या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. या चित्रपटात प्रसिद्ध संगीतकार आणि अभिनेता जीव्ही प्रकाश आणि अनस्वरा राजन मुख्य भूमिकेत आहेत. त्यांच्यासोबतच देवदर्शिनी, कोवई सरला, सुब्बू पंचू, मोट्टा राजेंद्रन आणि डॅनियल ॲनी पोप यांसारख्या तमिळ सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकारांची फौज पाहायला मिळणार आहे.

# साऊथच्या 'या' अभिनेत्रीचा बॉलीवूडमध्ये झाला होता अपमान !



'साकिनी डाकिनी', उत्सवम, नेने ना अशा अनेक दाक्षिणात्य चित्रपटांत काम करत रेजिना कॅसेंड्राने तिची ओळख निर्माण केली आहे. तिने प्रामुख्याने तमीळ आणि तेलुगू चित्रपटांत काम केले आहे. मात्र, हिंदी सिनेमांत तिने कमी काम केले आहे. आता बॉलीवूडमध्ये तिने का जास्त काम केले नाही, याबद्दल तिने वक्तव्य केले आहे. रेजिना कॅसेंड्राचा जन्म चेन्नईमध्ये झाला. तिचे शिक्षणही तेथेच पूर्ण झाले. तिने २००५ साली प्रदर्शित झालेल्या कंदा नाल मुधल या तमीळ चित्रपटातील एका छोट्या भूमिकेतून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर विविध चित्रपटांत भूमिका साकारत ती प्रसिद्धीझोतात आली. अभिनेत्रीने अनिल कपूर आणि सोनम कपूर यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'एक लडकी को देखा तो ऐसा लगा' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. त्याबरोबर अभिनेत्री 'केसरी-चॅप्टर २' व 'जाट' या बॉलीवूड चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिकांत दिसली. अभिनेत्रीने नुकत्याच दिलेल्या एका बॉलीवूडमध्ये मोठ्या प्रमाणात काम न करण्याचे कारण सांगितले आहे. मुलाखतीत ती म्हणाली, अनेक लोकांनी मला अपमानास्पद वागणूक दिली. फक्त शब्दांनीच त्यांनी माझा अपमान केला असे नाही, तर त्यांच्या कृतीतूनही मला ते दिसले. मला खाली खेचण्याचा प्रयत्न केला गेला, हे कोणीही सांगू शकत होतं. मला ते जाणवलं. त्यामुळे उत्तरेत काम करण्यासाठी माझ्यापुढे मर्यादा होत्या; पण हे सांगत असताना हेही खरं आहे की, असं प्रत्येक वेळी घडत नाही. त्याबरोबरच हिंदी चित्रपटांमध्ये काम करण्याबद्दल ती म्हणाली, मी एक दाक्षिणात्य अभिनेत्री आहे. बहुतेक दक्षिण भारतीयांच्या तुलनेत माझी हिंदी खूपच चांगली आहे. मी हिंदी वाचू, लिहू व बोलू शकते. आजवर मी हिंदी भाषेत जे काही काम केले आहे, ते माझ्याच आवाजात केले आहे. ती माझी स्वतःची हिंदी आहे आणि मला दिलेल्या भूमिकेला न्याय देण्यासाठी मी नेहमीच प्रयत्न केला आहे. दरम्यान, आता आगामी काळात अभिनेत्री कोणत्या भूमिकांमध्ये दिसणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



# 'एक दिन' चित्रपटात साई पल्लवी

अभिनेता आमिर खानचा पुत्र जुनैद खानचा नवा चित्रपट 'एक दिन'चे फर्स्ट लुक पोस्टर सादर करण्यात आले आहे. या पोस्टरमध्ये साई पल्लवी आणि जुनैदची झलक दिसून येत आहे. निर्मात्यांनी आता या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखही जाहीर केली आहे. या चित्रपटाची निर्मिती आमिर खान करत आहे.

पोस्टरमध्ये जुनैद आणि साई हे हिमवृष्टीत कडाक्याच्या थंडीत आईस्क्रीम खात असल्याचे दाखविण्यात आले आहे. 'जीवनाच्या उलथापालथीत प्रेम तुम्हाला शोधेल, एक दिवस' असे याच्या कॅप्शन दाखल म्हटले गेले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन सुनील पांडे यांनी केले आहे. तर कहाणी स्नेहा देसाई आणि स्पनंद मिश्रा यांनी लिहिली आहे. मंसूर खान, आमिर खान आणि अपर्णा पुरोहित हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. तर संगीत राम संपत यांनी दिले आहे. एक दिन हा चित्रपट २०१६ मध्ये प्रदर्शित थाई चित्रपट 'वन डे'चा हिंदी रिमेक आहे. साईचा हा चित्रपट १ मे रोजी प्रदर्शित होणार आहे. जुनैदने २०२४ मध्ये 'महाराज' चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पाऊल ठेवले होते. त्यानंतर मागील वर्षी त्याचा 'लवयापा' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता, ज्याला फारसा चांगला प्रतिसाद मिळाला नव्हता. तर साई पल्लवी ही रणवीर कपूरसोबत 'रामायण' चित्रपटात काम करत आहे.

# निर्मिती सावंत पुन्हा सासूच्या भूमिकेत

अभिनेत्री निर्मिती सावंत पुन्हा एकदा सासूबाईच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहेत. नाटक, मालिका आणि सिनेमांच्या माध्यातून त्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहेत. अलीकडेच त्यांचा 'अगं अगं सुनबाई काय म्हणता काय सासूबाई' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. यातील त्यांच्या भूमिकेचे चाहत्यांकडून मोठे कौतुक करण्यात आले. त्यानंतर आता निर्मिती सावंत पुन्हा एकदा सासूच्या भूमिकेत दिसणार आहे.

निर्मिती सावंत यांच्या नव्या सिनेमाचा टीझर नुकताच रिलीज झाला आहे. 'सुपर डुपर' असं या सिनेमाचं नाव असून यात अभिनेता ललित प्रभाकर देखील नवीन भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहे. टीझरमध्ये अभिनेत्री निर्मिती सावंत डॅशिंग रोलमध्ये दिसत आहेत. त्यांनी नऊवारी साडी नेसली आहे. नाकात नथ आणि डोळ्यांवर काळा चष्मा लावला आहे. सोबतच हातात फायरिंग गन दिसत आहे. शेवटी टेलिव्हिजनचा हँडसम अभिनेता ललित प्रभाकर देखील कडक लुकमध्ये एन्ट्री घेताना दिसतोय. येत्या ३ एप्रिलला हा सिनेमा रिलीज होणार आहे. या टिझरमधून चित्रपटात निर्मिती सावंत, ललित प्रभाकर यांच्यासह शशांक शेंडे, हृषिकेश जोशी, नम्रता संभेराव, कुशल बद्रिके, प्रतीक्षा कोते आणि विदुला चौगुले ही कलाकार मंडळी पाहायला मिळणार आहेत. बऱ्याच दिवसांनंतर विदुला नवीन कलाकृतीतून तिच्या चाहत्यांना पाहायला मिळणार आहे. तसेच या चित्रपटातून पहिल्यांदाच ललित व विदुला एकत्र काम करत असल्याने या जोडीची ऑनस्क्रीन केमिस्ट्री पाहणं रंजक ठरू शकते.



# 'अशी' कामगिरी करणारा प्रसाद ठरला पहिला मराठी अभिनेता!

मराठी चित्रपटसृष्टीमधील प्रसिद्ध अभिनेता प्रसाद ओकने एक आनंदाची बातमी त्याच्या सर्व चाहत्यांबरोबर शेअर केली आहे. प्रसाद ओकची प्रमुख भूमिका असलेला 'धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे' हा सिनेमा २०२२ मध्ये प्रदर्शित झाला होता. या सिनेमात प्रसादने धर्मवीर आनंद दिघे यांची भूमिका साकारली होती. प्रसादने या भूमिकेला योग्य न्याय दिला असं म्हणत सर्वत्र त्याचं भरभरून कौतुक करण्यात आलं होतं. 'धर्मवीर'साठी प्रसाद ओकला त्या वर्षातील सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचे जवळपास सगळेच पुरस्कार मिळाले. आता या विशेष कामगिरीची नोंद जागतिक रेकॉर्ड्समध्ये करण्यात आली आहे. हे दोन विश्वविक्रम नेमके काय आहेत याबद्दल प्रसादने स्वत: माहिती दिली आहे.

प्रसाद भावना व्यक्त करत म्हणाला, १३ मे २०२२ यादिवशी धर्मवीर- मुक्काम पोस्ट ठाणे हा चित्रपट प्रदर्शित झाला. हा सिनेमा किती यशस्वी झाला हे तुम्हाला सर्वांना माहीत आहे. त्या वर्षात मला सर्वोत्कृष्ट अभिनयाचे एक-एक करून सगळे पुरस्कार मिळाले. खरंतर, इतक्या पुरस्कारांची मला सवय नव्हती. मी बरीच वर्षे या पुरस्कारांची वाट पाहत होतो पण, मला काही केल्या पुरस्कार मिळत नव्हते. पण, या चित्रपटाच्या निमित्ताने मला अनेक पुरस्कार मिळाले. तेव्हा मला एक गोष्ट जाणवली नव्हती की, या पुरस्कारांची संख्या नेमकी किती आहे किंवा प्रत्येक पुरस्कार मला मिळतोय हे माझ्या लक्षात आलं नव्हतं. पण, जसं वर्ष संपलंतसं माझ्या लक्षात आलं की, त्यावर्षीचे सगळे पुरस्कार मला 'धर्मवीर' चित्रपटासाठी मिळाले आहेत. या सगळ्या पुरस्कारांचं महत्त्व मला आज प्रकर्षाने जाणवतंय कारण, 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' आणि 'ग्लोबल बुक ऑफ इंग्लंड रेकॉर्ड' या दोन्ही रेकॉर्ड्समध्ये माझ्या या विश्वविक्रमाची नोंद झाली आहे. मी मराठीतला एकमेव कलाकार आहे ज्याला एका वर्षातील, एकाच सिनेमासाठी सर्वाधिक पुरस्कार मिळालेत. या दोन विश्वविक्रमांची माझ्या नावावर नोंद झालेली आहे. एका मराठी चित्रपटामुळे हा क्षण माझ्या वाट्याला आला याचा मला नितांत अभिमान आहे. या क्षणी मला निर्माते मंगेश देसाई, चित्रपटाचे दिग्दर्शक प्रवीण तरडे, माझी धर्मवीरची संपूर्ण टीम या सगळ्यांचे मनापासून आभार मानतो. धर्मवीर गुरुवर्य आनंद दिघे साहेबांच्या आशीर्वादाशिवाय हे शक्य नव्हतंत्यांचा मी कायम ऋणी आहे. अशा भावना प्रसाद ओकने व्यक्त केल्या आहेत. दरम्यान, प्रसाद ओकने शेअर केलेल्या पोस्टवर मराठी कलाकारांनी कौतुकाचा अन् शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. अभिनेत्याने एक लहानसा कार्यक्रम आयोजित करून त्याच्या दोन्ही जागतिक पुरस्कारांची झलक सर्वांना दाखवली आहे. या खास प्रसंगी त्याची पत्नी मंजिरी ओक देखील उपस्थित होती.



# चंद्रमुखी सुपरहिट झाला पण पुढे हातात काम नव्हतं...



अमृता खानविलकर ही मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री. मराठीसोबतच अमृताने तिच्या अभिनयाने बॉलिवूडही गाजवलं आहे. कट्यार काळजात घुसली, हर हर महादेव, साडे माडे तीन, आणि डॉ. काशिनाथ घाणेकर अशा अनेक सुपरहिट सिनेमांमध्ये तिने काम केलं. मात्र चंद्रमुखी या सिनेमाने अमृताची सिनेसृष्टीत एक वेगळी ओळख निर्माण झाली. या सिनेमात अमृताने साकारलेली चंद्रमुखी प्रचंड गाजली. मात्र या सिनेमानंतर अमृता दोन वर्ष एकटी पडली होती. तिच्या हातात काम नव्हतं असा खुलासा तिने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत केला आहे. अमृताने एका मुलाखतीत तिने चंद्रमुखी सिनेमानंतर अनुभवलेल्या परिस्थितीबद्दल भाष्य केलं. ती म्हणाली, चंद्रमुखीनंतर दोन वर्ष मी एकटी पडले होते. एवढा सुपरहिट सिनेमा दिल्यानंतर माझ्याकडे विविध प्रोजेक्टसची रांग लागली असेल, असं वाटणं स्वाभाविक होतं. पण मला कोणत्या प्रकारच्या भूमिकेबद्दल विचारावं हेच सिनेसृष्टीतल्या लोकांना कळत नव्हतं. त्यामुळे ती दोन वर्ष कोणताही प्रोजेक्ट हातात नव्हता. त्या काळात मराठी सिनेसृष्टीतून काहीच विचारणा झाली नाही. मग अशा परिस्थितीत निर्मितीची सूत्र हातात घेऊन उतरावं लागतं. आता नेहा पेंडसे हिचंच उदाहरण आहे. 'तिघी' नावाच्या सिनेमाची तीच निर्माती आहे आणि ती त्यात काम करत आहे.

मराठी सिनेसृष्टीतून म्हणावं तसं काम येतच नाहीये. अमृता सध्या तिच्या 'तस्करी' या वेबसीरिजमुळे चर्चेत आहे. या वेब सीरिजमध्ये अमृताने इमरान हाशमी सोबत स्क्रीन शेअर केली आहे. 'तस्करी'मध्ये अमृता कस्टम ऑफिसरच्या भूमिकेत आहे. याशिवाय राझी, हिंमतवाला, रंगून, सत्यमेव जयते' अशा हिंदी सिनेमांमध्येही तिने काम केलं आहे.



# स्वैर नर्तन करणाऱ्या स्वरांची गायिका: गीता दत्त

**वक्त ने किया, क्या हँसी सितम तुम रहे ना तुम, हम रहे ना हम...' 'कागज के फूल' चित्रपटात काळीज चिरत जाणाऱ्या स्वरातून गीता दत्त या गायिकेने जणू जीवनभरच्या दु:खाने व्यथित होऊन कोंडलेला कोंडमाराच मोकळा केला आहे. याच काळात या चित्रपटाच्या दरम्यान त्या वैयक्तिक आयुष्यही तसेच जगत होत्या. 'जायेंगे कहाँ सूझता नही चल पडे मगर रास्ता नही...' संसारिक जीवनातील अंगावर आलेले वादळी वारे त्यांना सोसत नव्हते. द्विधा मन:स्थितीत मन:शांती भंग होते. कैफी आझमी या दिग्गज कवीने जणू गीता दत्त यांच्या वास्तव दर्शनासाठीच हे लिहिले होते. 'मेरा सुंदर सपना बीत गया मै प्रेम मे सबकुछ हार गयी...' १९४७ सालच्या 'दो भाई' चित्रपटातील या गाण्यापासून त्या मान्यताप्राप्त गायिका झाल्या.**

सुरुवातीलाच यशस्वी गायिलेल्या गाण्याप्रमाणे जीवनाची सायंकाळ व्यतीत करावी लागेल, याची या स्वरकिन्नरीला कल्पनाही नसेल. दु:खाच्या छायेतला स्वर मात्र रसिकांना आवडला. गायिका म्हणून चित्रपटात पदार्पण केल्यावर १२-१३ वर्षांतील आनंदाच्या व उत्कर्षाच्या क्षणांनी त्या मोहरल्या. संपूर्ण चित्रपटसृष्टी त्यांच्या स्वैरपणे नर्तन करणाऱ्या कारंजातील तुषाराप्रमाणे तर कधी विव्हळ संन्यासिनीच्या अभिनिवेशातील आवाजाने अक्षरश: वेडी झाली होती.

'मेरा नाम चुन चुन चुन बाबा चुन चुन चुन...' 'हावडा ब्रिज' चित्रपटातील गिरेबाज आविष्कारातील हे गाणे गीता दत्त यांची ओळख झाली. 'गीता दत्तचा आवाज चाकूचे झगमगाते पाते आहे' असे उगाचच म्हटले नाही. 'मेरा सुंदर सपना' गाणार्या गीता दत्त 'चुन चुन चुन...' ही तेवढ्याच अनोख्या लकबीत गाऊ शकतात, यावरून त्यांच्या आवाजाची रेंज कुठल्याही फूटपट्टीत मोजता येणारी नाही, हे सिद्ध होते. 'बाबुजी धीरे चलना, प्यार मे जरा संभलना हाऽऽ बडे धोके है, बडे धोके है इस राह में...' गीता दत्त यांनी लाडिक स्वरातील हे मधुर गाणे अतिशय खेळकर अंदाजात म्हणून धोक्याचा इशाराही दिला आहे. 'धीरे चलना' म्हणताना 'चलना' म्हणतानाची नजाकत काही औरच! हे गाणे आसमंतात निनादले तर आजही ऐकण्यासाठी पाय थबकतात.

'ओऽ ल ल्ल ल्ला! ओ ऽ ल ल्ल ल्ला सुनो गजर क्या गाये समय गुजरता जाये ओ रे जिनेवाले ओ रे मरनेवाले हो.. ना.. ना..' १९५१ च्या 'बाजी' चित्रपटातील हे तडफदार उद्दिप्य गीत गीता दत्त यांच्या जादुई आगळ्या पद्धतीच्या स्वर चातुर्याचा विलास आहे. किशोर कुमार यांनी जशी स्वत:ची युडलिंग स्टाईल अस्तित्वात आणली, त्याचप्रमाणे गीता दत्त यांनी गाण्याची स्वत:ची अनोखी शैली बनवली होती. जुगाराच्या अड्ड्यावरून निघून जाणाऱ्या देव आनंद यांना गीता बाली थांबवितात व डाव लावण्यास सुचवितात.

लता मंगेशकर व गीता दत्त यांची खरी कारकीर्द साधारण बरोबरच सुरू झाली. पण गीता दत्त यांच्या आवाजातील रेंज फार थोड्या संगीतकारांनी उपयोगात आणली. त्यात ओ. पी. नय्यर व एस. डी. बर्मन प्रमुख होते. नवकेतनचा 'बाजी' दिग्दर्शित करताना गुरुदत्तशी संधान जमले व १९५३ साली यांचा विवाह झाला. 'उधर तुम हँसी हो इधर दिल जवा है ये रंगीन रातो की एक दास्ता है...' मो. रफी. १९५५ च्या 'मिस्टर अँड मिसेस ५५' चित्रपटात रफीच्या आवाजात गुरुदत्त साद देतो. लग्न झाल्यावर आलेल्या गुरुदत्त वरील प्रेमाच्या उर्मीत गीता त्याच्या चित्रपटात दिलखुलास गायल्या. गुरुदत्तसारखा निर्माता, निर्देशक, अभिनेता नवरा लाभूनही गीता दत्त यांच्या वाट्यास शापित यक्षिणीसारखे वैवाहिक जीवन आले. लग्न झाल्यानंतर फक्त त्यांच्याच चित्रपटात गाणी म्हणायची, या बंधनात त्या बांधल्या गेल्या. या बंधनामुळे सिनेसृष्टी गीता दत्त यांच्या किती गाण्यांना व आनंद क्षणांना मुकली असेल, याचा अंदाज करता येणार नाही. लग्नाआधी दोन प्रेयसींच्या प्रेमात विफल झालेले गुरुदत्त 'प्यासा' चित्रपटादरम्यान वहिदा रेहमानच्या प्रेमात पडले व स्वत:च्या सोन्यासारख्या संसारात बाधा आणली. चार चित्रपटाचा करार संपल्यावर वहिदा अन्य निर्मात्यांच्या चित्रपटात निघून गेल्या. ज्या ओ. पी. नय्यरांना गीता दत्त यांनी सोन्याच्या पालखीत बसविले त्यांनीही नंतर आशा भोसले यांना निवडले. गुरुदत्त हे कलासक्त प्रतिभावंत होते. परंतु तीन मुले झाल्यावर गीता दत्तसारख्या कलाकार पत्नीवर अन्याय करून त्यांचा कोंडमारा केला व स्वत: अतृप्त प्रेमी ठरले. शेकडो सुप्रसिद्ध गाणी गीता दत्त यांनी गायली असतील, याची कल्पना फार थोड्या रसिकांना असेल. 'न जावो सैयां छुडाके बैय्या कसम तुम्हारी मै रो पडोगी' वरील चित्रपटात पतीसाठी सांजशृंगार करून नटलेली छोटी बहू, बाहेरख्याली नवर्याला बाहेर जाण्यापासून जिवाच्या आकांताने गीता दत्तच्या वरील गाण्याद्वारे रोखते. हाच प्रयोग गीता यांच्या आयुष्यात यशस्वी झाला असता तर सारेच बदलले असते. २३ नोव्हेंबर १९३० रोजी बंगालमधील ईदलापूर गावी जन्म झालेल्या गीता रॉय यांना लहानपणापासून गाण्याची आवड असल्यामुळे वडिलांनी त्यांना मुंबईस आणले. मुंबईत गाण्याचा रियाज करीत असताना त्यांचे स्वर हनुमानप्रसाद या सिनेसंगीतकाराने ऐकले. त्यांनी त्यांच्या घरी जाऊन आपली ओळख सांगून गीता दत्त यांना चित्रपटात गाण्यास उद्युक्त केले. १९४६ साली 'भक्त प्रल्हाद' चित्रपटात त्यांच्याकडून पहिले गाणे गाऊन घेतले. १९४७ साली तब्बल १२ चित्रपटात त्या गायल्या. त्यातील 'दो भाई' या एस. डी. बर्मन यांच्या संगीतातील गाण्यांनी त्यांना लोकप्रियता मिळाली. बर्मन देखील गीता दत्त यांनी गायलेल्या गाण्यांमुळे प्रसिद्धीस आले. गीता दत्त यांनी २५० हिंदी चित्रपटासाठी १४०० हून अधिक गाणी गायलीत. १९५३ साली त्यांचा गुरुदत्तसोबत विवाह झाला. गुरुदत्त यांनी १० ऑक्टोबर १९६४ रोजी आत्महत्या करून जीवन संपविले. गीता यांचे २० जुलै १९७२ रोजी निधन झाले आणि चंदेरी दुनियेतील एक स्वप्नवत जादुई आवाज स्तब्ध झाला.

रमेश पोफळी

# नागार्जुनला 'त्या' रोलसाठी विचारलेच नाही?

अक्षय खन्ना 'धुरंधर'मधील भूमिकेमुळे चर्चेत आहे. त्याने यामध्ये साकारलेल्या रहमान डकैतच्या भूमिकेने प्रेक्षकांचं लक्ष वेधलं. चित्रपटातील त्याचे संवाद, एन्ट्री, डान्स हे सगळंच सोशल मीडियावर तुफान व्हायरल झालं, त्यामुळे देशभरातून अनेकांनी त्याच्या कामाचं कौतुक केलं. अशातच दाक्षिणात्य अभिनेत्यानेही त्याचं कौतुक करत 'धुरंधर'बद्दल प्रतिक्रिया दिली आहे.

'धुरंधर'मध्ये रहमान डकैतच्या भूमिकेसाठी विचारणा झाली होती, पण नकार दिला अशी अफवा दाक्षिणात्य अभिनेते नागार्जुन यांच्याबद्दल पसरली होती.परंतु, त्याने स्वत: याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी त्याने अदित्य धरच्या दिग्दर्शनाचं कौतुक करत 'धुरंधर'मध्ये काम करायला आवडलं असतं, अशी इच्छाही व्यक्त केली आहे. नागार्जुन याबद्दल म्हणाले, असं अजिबात नाहीये, मला त्या रोलसाठी विचारणा झाली नव्हती. पण, मला आवडलं असतं त्यामध्ये काम करायला. 'धुरंधर' सुपरहिट चित्रपट आहे. आदित्य धरने खूप छान दिग्दर्शन केलं आहे. मला त्याचा या आधीचा 'उरी' चित्रपटही खूप आवडलेला. सगळ्यांनीच खूप छान अभिनय केला आणि अक्षय खन्नाने तर कमाल काम केलंय.

दुसऱ्या भागाची आतुरतेने वाट पाहत आहे. 'धुरंधर'बद्दल बोलताना नागार्जुन यांनी स्पष्ट केलं की, त्यांना 'धुरंधर' कधीच ऑफर झाला नव्हता आणि त्यांनी रहमान डकैतच्या भूमिकेला नकार दिलेलाच नाही. अक्षय खन्नाने साकारलेलं रहमान डकैत हे पात्र 'धुरंधर'मधील महत्त्वाच्या गोष्टींपैकी एक आहे.

अनेक प्रेक्षकांनी अक्षय खन्ना इतरांच्या तुलनेत भाव खाऊन गेला असंही म्हटलं आहे. चित्रपटातील त्याच्या फासला गाण्यावरील एन्ट्रीमुळे तो तुफान व्हायरल झाला आणि त्यानंतर तो अनेकांच्या चर्चेचा विषय ठरला.


दरम्यान, ५ डिसेंबर २०२५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'धुरंधर'ने बॉक्स ऑफिसवरचे अनेक रेकॉर्ड मोडले, तर चित्रपट प्रदर्शित होऊन दोन महिने होऊन गेल्यानंतरही आजही चित्रपटाची तिकीट विक्री सुरू आहे. महत्वाचं म्हणजे ओटीटीवर चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरही प्रेक्षक थिएटरमध्ये जाऊन चित्रपट पाहण्याला अधिक पसंती देत आहेत.



# ‘अक्यूज्ड’मध्ये कोंकणा अन् प्रतिभा

कोंकणा सेन शर्मा आणि प्रतिभा रांटा स्वत:चा आगामी चित्रपट ‘अक्यूज्ड’वरून चर्चेत आहे. अलिकडेच याचा टीझर प्रदर्शित करण्यात आला असून त्याला प्रेक्षकांची पसंती लाभली आहे. अनुभूति कश्यपच्या दिग्दर्शनातील हा सायकोलॉजिकल थ्रिलर चित्रपट २७ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणार आहे.

नेटफ्लिक्सवर हा चित्रपट पाहता येणार आहे. याची कहाणी सीमा अग्रवाल आणि यश केसवानी यांनी लिहिली असून करण जौहर, अदार पूनावाला, अपूर्व मेहता, सोमेन मिश्रा यांनी धर्मा प्रॉडक्शन्सच्या बॅनर अंतर्गत या चित्रपटाची निर्मिती केली आहे. अक्यूज्ड ही लंडनमधील एका नामांकित डॉक्टरची कहाणी आहे. डॉक्टरवर लैंगिक गैरवर्तनाचा आरोप झाल्यावर त्याचे आयुष्य विखुरले जाते. याप्रकरणी तपास सुरू होताच त्याच्या अडचणी वाढू लागतात. तपास त्याचे नातेसंबंध आणि अब्रूवर प्रभाव पाडतो. सत्य माहित नसल्यास धारणा लवकरच वरचढ ठरू लागतात असे यात दाखविण्यात आले आहे. एका महिलेच्या आरोपाला केंद्रस्थानी ठेवत तयार करण्यात आलेला हा चित्रपट अस्वस्थता आणि संशयाची कहाणी दाखविणारा आहे. ‘अक्यूज्ड’ हा प्रतिभा रांटाचा दुसरा चित्रपट आहे. यापूर्वी ती २०२३ मध्ये किरण रावचा चित्रपट ‘लापता लेडीज’मध्ये दिसून आली होती. या चित्रपटातील तिच्या अभिनयाचे मोठ्या प्रमाणात कौतुक झाले होते. यानंतर तिला अनेक चित्रपटांचे प्रस्तावही मिळाले आहेत.



# सनी देओल ‘या’ चित्रपटांतून झळकणार

अभिनेता सनी देओल सध्या ‘बॉर्डर २’मुळे चर्चेत आहे. प्रेक्षकांचा या चित्रपटाला तुफान प्रतिसाद मिळत आहे. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने चांगली कमाई केली. अशातच आता सनी देओलने त्याच्या आगामी चित्रपटांची घोषणा केली आहे. सनी देओलने ‘बॉर्डर २’मध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे. त्याच्यासह या चित्रपटात दिलजीत दोसांझ, वरुण धवन, अहान शेट्टी हे कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये झळकले. अशातच सनी देओलने वृत्तानुसार सनी देओलने त्याच्या आगामी चित्रपटांची घोषणा केली आहे. सनी देओलने येत्या काळात लवकरच त्याचा चित्रपट प्रदर्शित होणार असल्याचं म्हटलं आहे. उल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृत्तानुसार अभिनेता म्हणाला, सध्या माझ्याकडे दोन चित्रपट आहेत. एक ‘लाहौर १९४७’ आणि दुसरा ‘गबरू.’ हा चित्रपट १५ ऑगस्टला प्रदर्शित होणार आहे. ‘गबरू’ चित्रपटाबद्दल सनी देओल म्हणाला, गबरू हा चित्रपट खूप छान आहे, माझ्या खूप जवळचा आहे. तो चित्रपट कदाचित फार चालेल की नाही माहीत नाही, पण मला चित्रपट खूप आवडला आहे. ‘गबरू’ चित्रपटातील भूमिकेबद्दल सनी देओल म्हणाला, छोट्या शहरात राहणारे बरेच लोक मोठ्या शहरात जाऊन काहीतरी बनण्याचं स्वप्न पाहतात, ही गोष्ट तशीच आहे. मग शहरात तो कसा अडकतो, काय करायला आलो होतो आणि काय करतोय असं त्याला वाटतं, त्यामुळे तो गावीसुद्धा जाऊ शकत नसतो. सनी देओलकडे सध्या बरेच चित्रपट आहेत. गबरू आणि लाहौर १९४७ या चित्रपटांव्यतिरिक्त इतरही काही चित्रपट आहेत. सनी देओलकडे ‘इक्का’, ‘रामायण पार्ट १’ आणि ‘रामायण पार्ट २’ असे चित्रपट आहेत, त्यामुळे येत्या काळात अभिनेता विविध भूमिकेतून पाहायला मिळणार आहे. ‘रामायण’मध्ये तो हनुमाच्या भूमिकेतून झळकणार आहे.



# ‘गिनी वेड्स सनी २’ चा फर्स्ट लूक समोर

१२ वी फेल या चित्रपटातून लोकप्रियता मिळवलेली अभिनेत्री मेधा शंकर आता पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर आपली जादू दाखवण्यास सज्ज आहे. गिनी वेड्स सनी २ या चित्रपटात अभिनेत्री मुख्य भूमिकेत झळकणार असून, या चित्रपटाचा फर्स्ट लूक समोर आला आहे. चित्रपटाच्या पोस्टरसोबत प्रदर्शनाची तारीखही जाहीर करण्यात आली आहे. निर्मात्यांनी सोशल मीडियावर गिनी वेड्स सनी २ चित्रपटाचे पहिले पोस्टर शेअर केले आहे. या पोस्टरमध्ये अविनाश तिवारी एका कुस्तीगीराची भूमिका साकारताना दिसत आहे. तो व्यायाम करताना पुश-अप करत आहे, तर मेधा शंकर त्याच्यावर ध्यानस्थ अवस्थेत बसलेली दिसत आहे.

मेधा शंकर लाल साडीत खूप सुंदर दिसत असून तिच्या चेहऱ्यावर हास्य दिसत आहे, तर अविनाश तिवारी कुस्तीच्या कपड्यात शर्टलेस दिसत आहे. पोस्टर शेअर करताना निर्मात्यांनी कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, गिनी आणि सनी परत आले आहेत. नाते निश्चित झाले आहे, फक्त यावेळी थोडा ट्विस्ट आहे. यासोबतच निर्मात्यांनी चित्रपटाची प्रदर्शनाची तारीख देखील जाहीर केली आहे. हा चित्रपट २४ एप्रिल रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. विनोद बच्चन आणि उमेश कुमार बन्सल निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन प्रशांत झा यांनी केले आहे. चित्रपटाच्या कलाकारांबद्दल आणि कथेबद्दल अद्याप फारशी माहिती समोर आलेली नाही. हा चित्रपट विक्रांत मेस्सी आणि यामी गौतम यांच्या २०२० मध्ये आलेल्या गिनी वेड्स सनी या चित्रपटाचा सिक्वल असणार आहे. मात्र, यावेळी चित्रपटातील मुख्य कलाकार बदलले आहेत. चित्रपटाची कथा देखील पूर्णपणे वेगळी असणार आहे. त्यामुळे बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट कशी कामगिरी करतो हे पाहणे उत्सुकतेचे असणार आहे.





# 'पुरुषन'मध्ये तमन्ना भाटिया

अभिनेता विशाल, तमन्ना भाटिया आणि दिग्दर्शक सुंदर सी हे पुन्हा एकत्र काम करणार आहेत. त्यांच्या नव्या चित्रपटाचे नाव 'पुरुषन' असून याचा टीझरही सादर करण्यात आला आहे. या चित्रपटाची कहाणी ॲक्शनने भरपूर असून अभिनेता विशालची भूमिका एक शांत अन् आज्ञाधारक पतीची असून तो घरातील सर्व कामे करतो. परंतु त्याच्या आत लपलेला एक हिंसक आणि ॲक्शनयुक्त इसम असून त्याविषयी त्याची दबंग पत्नी (तमन्ना) अनभिज्ञ असते. या चित्रपटाची निर्मिती एसीएस अरुण कुमार यांनी बेन्ज मीडियाच्या अंतर्गत केली आहे. यात खुशबू सुंदरही दिसून येणार आहे. तर चित्रपटाला संगीत हिपहॉप तमिझाने दिले आहे. या चित्रपटात योगी बाबूची भूमिका असल्याने याला विनोदी स्पर्श देण्यात आल्याचे मानले जात आहे. हा विशाल आणि सुंदर सी यांचा एकत्रित चौथा चित्रपट आहे. यापूर्वी त्यांनी 'आंबला', 'ॲक्शन' आणि 'मधा गज राजा' यासारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. विशाल-सुंदर सी या हिट जोडीच्या चित्रपटाची चाहते प्रतीक्षा करत असतात. तर तमन्नाचे चाहते तिच्या या चित्रपटाच्या प्रदर्शनाची प्रतीक्षा करत आहेत.



# कंगनाचा झाला हिरमोड

बॉलीवूड अभिनेता अक्षय खन्ना तीन दशकांपासून इंडस्ट्रीत काम करत आहे. पण, 'धुरंधर'नंतर तो चर्चेचा विषय ठरला. फक्त प्रेक्षकच नाही, तर त्यानंतर अनेक कलाकारांनीसुद्धा त्याचं कौतुक केलं. 'धुरंधर'मुळे अक्षय खन्नाचे आजवरचे अनेक जुने किस्से व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. अशातच आता कंगना रणौत हिनं अक्षय खन्नाबद्दल काही वर्षांपूर्वी दिलेल्या प्रतिक्रियेची रील व्हायरल होत आहे. कंगनानं 'कॉफी विथ करण' या कार्यक्रमात अक्षय खन्ना तिच्याकडे बघतही नाही, असं म्हटले होते. कंगना अक्षय खन्नाबद्दल नेमकं काय म्हणालेली याबद्दल सविस्तर जाणून घेऊ... एका मुलाखतीत कंगनाबरोबर अनिल कपूर व संजय दत्तसुद्धा उपस्थित होते. करणनं कंगनाला तू अक्षय खन्नाबरोबर फ्लर्ट करण्याचा प्रयत्न केला आहेस का? असं विचारलं. त्यावर कंगना म्हणालेली, हो. पण, त्याच्याकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. कंगनाला करण जोहरनं तिनं यापूर्वी कोणाबरोबर फ्लर्ट करण्याचा प्रयत्न केलाय आणि त्या व्यक्तीनं प्रतिसादच नाही दिला, असं झालंय का? असं विचारलं असता, कंगनानं अक्षय खन्नाचं नाव घेतलं. कंगनाचं ते उत्तर ऐकून संजय दत्तच्या चेहऱ्यावरचे हावभाव उडाले आणि अनिल कपूरच्या चेहऱ्यावर मात्र त्याला हे पूर्वीच माहीत होतं, असे हावभाव होते. कंगनानं अक्षयचं नाव घेतल्यानंतर संजय दत्त तर चकित झाला. परंतु, अनिल कपूर म्हणाला, हो तिनं मला याबद्दल सांगितलं आहे. ती म्हणालेली की, अरे, तो माझ्याकडे बघतच नाही. कंगना त्याबद्दल पुढे म्हणाली, मी त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. नंतर मी त्याच्याबरोबर फ्लर्ट करण्याचा प्रयत्न केला; पण तो माझ्याशी काहीच बोलला नाही. त्यावर जेव्हा करणनं पण असं का, असा प्रश्न विचारला तेव्हा कंगना म्हणाली, तो बोलतच नाही. तो कोणाबरोबरच बोलत नाही. पुढे अनिल यांच्याकडे बघत ती म्हणाली, तो तुमच्याशी बोलतो का? त्यावर अनिल कपूर, हो. तो माझ्याशी खूप मनमोकळेपणाने बोलतो आणि त्याला माझा लहान भाऊ खूप आवडतो, असं म्हणाले.

# 'फॅमिली बिझनेस' सीरिजमध्ये अनिल कपूर



नेटफ्लिक्सची आगामी सीरिज 'फॅमिली बिझनेस'ची घोषणा झाली आहे. प्रसिद्ध फिल्ममेकर हंसल मेहतांच्या दिग्दर्शनातील ही सीरिज सत्ता, रक्ताचे नाते आणि विश्वासघाताच्या अवतीभवती घुटमळणारी एक हाय-व्होल्टेज कॉर्पोरेट ड्रामा आहे. सीरिजमध्ये अनिल कपूर आणि विजय वर्मा या शैलीत आमने-सामने दिसून येणार आहेत. कहाणी एक अशा दूरदर्शी अब्ज-धीश उद्योजकापासून सुरू होणार आहे, जो भारताच्या सर्वात मोठ्या बिझनेस कॉन्ग्लोमरेटची धुरा स्वत: निवडलेल्या उत्तराधिकाऱ्याला सोपवितो. हा नवा उत्तराधिकारी आता सत्ता कायमस्वरुपी आपल्या हातात आल्याचा विचार करत असतो. परंतु काही महिन्यातच स्थिती बदलून जाते. मेंटर अचानक त्याला पदावरून हटवतो आणि स्वत: पुन्हा धुरा हाती घेत असतो. हा अपमान आणि सत्तेपासून बेदखल होणे उत्तराधिकाऱ्याला बंडाच्या मार्गावर लोटणारे ठरते. यानंतर कॉर्पोरेट सक्सेशनची ही लढाई एका निर्दयी संघर्षात रुपांतरित होते. कहाणी पुढे सरकू लागताच जुनी गुपितं समोर येऊ लागतात, नात्यांना तडा पडू लागतो. प्रश्न केवळ बिझनेस नियंत्रणाचा राहत नाही, तर वारसा, रक्ताचे नाते आणि वैयक्तिक सूडाची आग पूर्ण फॅमिली एम्पायरला तोडण्याच्या वाटेवर नेणारा ठरतो. या सीरिजची कहाणी दीपाली गुप्त यांनी लिहिली आहे. तर संवादाची जबाबदारी निरेन भट्ट, अंकुर पाठक आणि निखिल नायर यांनी सांभाळली आहे. एंबडँशिया एंटरटेन्मेंट आणि टू स्टोरी फिल्म्सच्या बॅनर अंतर्गत या सीरिजची निर्मिती करण्यात आली आहे. अनिल कपूर, विजय वर्मासोबत या सीरिजमध्ये आकाश खुराना, रिया चक्रवर्ती, नेहा धूपिया, अनंत नाग, कंवलजीत सिंह, ध्रूव सहगल, नंदिश संधू, टीना देसाई, रायमा सेन समवेत अनेक दमदार कलाकार दिसून येणार आहेत. नेटफ्लिक्सच्या 'नेक्स्ट ऑन नेटफ्लिक्स' स्लेट अंतर्गत या सीरिजची पहिली झलक दाखविण्यात आली आहे.